आपलं सांज

# सह्याद्री टाइम्स



जाहिर प्रगटन,पासपोर्टसाठी चेंज ऑफ नेम जाहिरातीसाठी संपर्क साधावा.अल्पदरात जाहिरात प्रसिद्ध केल्या जातील.

जाहिरातीसाठी संपर्क

8459270916



सायं दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष २४ ■ अंक १४१ ■ सोमवार, दि.१२ ऑक्टोबर २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू. RNI No. MAHMAR/2003/10715 Website: aaplasanjsahyadritimes.com संस्थापक संपादक:संदीप काळे

Evening daily ■ Aapla Sanj Sahyadri Times ■ Chhatrapati SambhajiNagar ■ Vol.24 ■ Issue 141 ■ MONDAY, 12 OCTOBER 2026 ■ Page 4 ■ Price. ₹1 ■ RNI NO.MAHMAR/2003/10715


### राहुल गांधींना सरन्यायाधीशांचा दणका!

## भेटण्यास स्पष्ट नकार; इंडिया आघाडीच्या मोर्च्यापूर्वी निर्णय



**नवी दिल्ली,प्रतिनिधी:**

-------------------

एसआयआर प्रकरणावरून केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात आक्रमक झालेल्या विरोधी पक्षाला आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयातून मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी राहुल गांधी आणि इंडिया' आघाडीच्या नेत्यांना भेटण्यास थेट नकार दिला आहे.एसआयआर संबंधित मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी राहुल गांधी यांनी सरन्यायाधीशांकडे वेळेची मागणी केली होती. मात्र, सरन्यायाधीशांनी ईमेलद्वारे उत्तर पाठवत हा प्रस्ताव तात्काळ फेटाळून लावला.राहुल गांधी यांचा प्रस्ताव फेटाळताना सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी घटनात्मक चौकटीची आठवण करून दिली. त्यांनी ईमेलमध्ये नमूद केले की, विरोधी पक्षनेते ज्या मुद्द्यांवर चर्चा करू इच्छित आहेत, ते विषय आधीपासूनच सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.संविधानिक प्रणालीनुसार सर्वोच्च न्यायालय कोणत्याही परिस्थितीत कार्यकारी मंडळाच्या प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करू शकत नाही. विरोधी पक्षाच्या नेत्यांना कोणत्याही मुद्द्यावर कायदेशीर आणि न्यायालयीन दाद मागण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे.

ते नियमानुसार याचिका दाखल करू शकतात आणि मंगळवारी एसआयआर संदर्भातील सुनावणीदरम्यान त्यावर विचार केला जाऊ शकतो,असे देखील त्यांनी म्हटले. निवडणूक आयोगाने राबवलेली एसआयआर प्रक्रिया आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात सध्या विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेससह विरोधी पक्षांची इंडिया आघाडी कमालीची आक्रमक झाली आहे. तसेच आपल्या मागण्यासांठी राहुल गांधी आणि इंडिया आघाडीकडून आज थेट सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढून सरन्यायाधीशांना निवेदन देण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र सर्वोच्च न्यायालायात भेटण्यास येणाऱ्या विरोधकांना भेटण्यास सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी असमर्थता दर्शवली आहे. तसेच थेट प्रसारमाध्यमांसमोर येत आपली भूमिका मांडली आहे.राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या नियोजित मोर्चामुळे दिल्लीतील वातावरण तापलं असताना माध्यमांसमोर आलेले सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सांगितले की, त्यांचं पत्र मला काल मिळालं आहे. तसेच त्याला मी उत्तरही दिलं आहे. तसेच शिष्टमंडळ घेऊन भेटायला येणाऱ्या विरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटण्याबाबत मी असमर्थता व्यक्त केली आहे.तसेच त्यामागची काही कारणंही मी सांगितली आहेत, असे सरन्यायाधीश म्हणाले. सरन्यायाधीशांनी पुढे सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत. कुणीही नागरिक असो वा कुठल्या लोकनियुक्त संस्थेतील सदस्य असो, तो याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊ शकतो. आमच्याकडे येण्याचा भारतातील प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. आम्ही कायदेशीर व्यवस्था आणि कायद्यानुसार त्याची जी समस्या असेल त्यावर आम्ही सुनानणी घेऊ. तसेच त्यांना त्यांचा योग्य तो अधिकार देऊ.यावेळी दिल्लीत सातत्याने होत असलेल्या आंदोलनांबाबत विचारले असताहा कायदा आणि सुव्यवस्थेचा विषय आहे. तो माझा विषय नाही, असे सरन्यायाधीशांनी सांगितले.

## ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांचे निधन



**पुणे,प्रतिनिधी: मराठी मनोरंजन विश्वातील दिग्गज अभिनेत्री मधु कांबीकर यांचं निधन झालं आहे. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पुण्यात दीर्घ आजाराने मधु कांबीकर यांची प्राणज्योत मालवली. मधु कांबीकर यांची लावणी कलावंत म्हणूनही ओळख होती. मधु कांबीकर यांच्या निधनामुळे मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मधु कांबीकर यांनी नाटक, सिनेमा माध्यमातून अमाप लोकप्रियता मिळवली. नोव्हेंबर २०१६ रोजी, मुंबईतील एका कार्यक्रमात लावणीचं सादरीकरण करताना त्या बेशुद्ध झाल्या. तेव्हापासून त्या अंथरुणावर खिळून होत्या. अखेर आज दीर्घ आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली.** मधु कांबीकर यांनी कारकीर्दीच्या सुरुवातीला अनेक वगनाट्यांमधून काम केलं. दादू इंदूरीकरांच्या गाढवाचं लग्न नाटकात मधु कांबीकर यांनी साकारलेली भूमिका प्रचंड गाजली. पुढे भानगडीशिवाय पुढारी नाही', विच्छा माझी पुरी करा या गाजलेल्या नाटकांमधून मधु कांबीकर यांनी रंगभूमी गाजवली. मधु कांबीकर यांची सिनेसृष्टीतील कारकीर्दही समृद्ध करणारी होती. १९७७ ते २०१५ दरम्यान मधु कांबीकर यांनी गाजलेल्या चित्रपटांमध्ये अभिनय केला. बिन कामाचा नवरा, सतीची पुण्याई, एक होता विदुषक, चल रे लक्ष्या मुंबईला, झपाटलेला, मुक्ता, कुंकू, राजा पंढरीचा, गोष्ट छोटी डोंगराएवढी अशा गाजलेल्या चित्रपटांमध्ये मधु कांबीकर यांनी काम करुन प्रेक्षकांचं मन जिंकलं. मधु कांबीकर यांच्या निधनामुळे सिनेसृष्टीतील अनेक मान्यवरांनी आणि त्यांच्या चाहत्यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना श्रद्धांजली

**मुंबई,प्रतिनिधी:**महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जतन करत रुपेरी पटावर अदाकारी आणि चतुरस्त्र अभिनयाने आपली ओळख निर्माण करणारी तारका निमाल्याची शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करताना व्यक्त केली आहे.

'लोककला, रंगभूमी ते चित्रपट सृष्टी असा मधू कांबीकर यांचा कला प्रवास राहीला. लोककलेतील लावणीचा पारंपरिक बाज जपत त्यांनी कथ्थकच्या अभ्यासातून नृत्यांगना म्हणून लौकिक मिळविला. लावणीला आपल्या नृत्य शैलीने आणि नजाकतीने दिमाख मिळवून दिला. रुपेरी पडद्यावरही त्यांनी लावणीचे रूप आणखी खुलवून दाखविले. त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत कसदार अभिनयाने अनेक वैविध्यपूर्ण भूमिका समर्थपणे साकार केल्या. कांबीकर यांचा कला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण आणि या क्षेत्रातील दोन पिढ्यांसाठी मार्गदर्शक, प्रेरणादायी असा राहीला आहे. ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे निधन कला क्षेत्राची मोठी हानी असून, मराठी लोक कलेची पताका रुपेरी पडद्यावर दिमाखाने फडकत ठेवणारी चतुरस्त्र तारका निमाली आहे.

## कन्नडमध्ये कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :**

---------------

कन्नड शहरातील गजानन कॉलनी परिसरात कौटुंबिक वादातून पतीने पत्नीची हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. रोहिणी मुकेश कुंभकर्ण असे मृत महिलेचे नाव आहे. पत्नीची हत्या केल्यानंतर पती मुकेश कुंभकर्ण याने स्वतः पोलीस ठाण्यात हजर होऊन गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे कन्नड शहरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, मुकेश आणि रोहिणी यांच्यात कौटुंबिक कारणावरून वाद झाला होता. या वादातून संतापलेल्या मुकेश याने पत्नीची हत्या केल्याचे सांगितले जात आहे. घटनेनंतर तो पळून न जाता स्वतः कन्नड पोलीस ठाण्यात गेला आणि

### गजानन कॉलनीतील घटना; पतीची पोलिसांसमोर कबुली

पत्नीचा खून केल्याची माहिती पोलिसांना दिली.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन तो पुढील प्रक्रियेसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. दरम्यान, पती-पत्नीमध्ये नेमका कोणत्या कारणावरून वाद झाला होता आणि त्यातून हत्येची घटना कशी घडली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

पोलिसांनी आरोपी पतीला ताब्यात घेतले असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे. तपासातून हत्येमागील नेमके कारण आणि घटनेचा घटनाक्रम स्पष्ट होणार आहे.

## संतोषीमातानगरमध्ये गावठी कट्टा जप्त; तरुणाला अटक

### मुकूंदवाडी पोलिसांच्या विशेष पथकाची धडक कारवाई

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** शहरातील संतोषीमातानगर परिसरात मैदानाच्या भिंतीलगत लपवून ठेवलेला गावठी कट्टा मॅगझिनसह मुकुंदवाडी पोलिसांच्या विशेष पथकाने जप्त केला. याप्रकरणी प्रियांशू सतीश खोमणे (वय १९, रा. मुकुंदवाडी गाव) या तरुणाला अटक करण्यात आली आहे. त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी नागरिकांची गर्दी वाढत आहे. या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच अवैध धंद्यांना आळा घालता यावा, यासाठी मुकुंदवाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक विवेक सोनवणे यांनी विशेष पथकाला सतर्क राहून गस्त घालण्याच्या सूचना दिल्या होत्या. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचेही निर्देश देण्यात आले होते.दरम्यान, पोलिस अंमलदार संतोष भानुशे यांना गोपनीय बातमीदारामार्फत संतोषीमातानगर येथील दोन एकर मैदानाच्या भिंतीलगत एका तरुणाने गावठी कट्टा लपवून ठेवल्याची माहिती मिळाली. त्यांनी ही माहिती विशेष पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित गांगुर्डे यांना दिली. त्यानंतर वरिष्ठ निरीक्षक विवेक सोनवणे यांच्या सूचनेनुसार पथकाने दोन पंचांसह संबंधित ठिकाणी धाव घेतली. तेथे प्रियांशू खोमणे हा तरुण आढळून आला. त्याच्याकडे चौकशी केली असता, मैदानाच्या भिंतीलगत गावठी कट्टा लपवून ठेवल्याचे त्याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित जागेची पाहणी केली असता, तेथे मॅगझिनसह गावठी कट्टा आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून हा शस्त्रसाठा जप्त केला. या प्रकरणी मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल करून प्रियांशू खोमणे याला अटक करण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित गांगुर्डे पुढील तपास करीत आहेत. संबंधित तरुणाकडे हा गावठी कट्टा कुठून आला, त्याने तो कोणत्या उद्देशाने लपवून ठेवला होता आणि या प्रकरणात आणखी कोणाचा



सहभाग आहे का, याचा तपास पोलिस करीत आहेत.

ही कारवाई पोलिस आयुक्त प्रवीण पवार, पोलिस उपायुक्त रत्नाकर नवले आणि उस्मानपुरा विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त मनीष कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मुकुंदवाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक विवेक सोनवणे, सहाय्यक निरीक्षक रोहित गांगुर्डे, सहायक उपनिरीक्षक नरसिंग पवार यांच्यासह विक्रमसिंग राऊळ, संदीप वैद्य, भीमा पवार, अनिल थोरे, संतोष भानुशे, श्याम आढे, विकास गुरुखेल, रविंद्र बेंडे, राहुल राठोड आणि दीपक इंगळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## पाणी नाही, तर पुढचे पीक कोणते?

### कमी पाण्यातील पिके, जमिनीतील ओलावा आणि उपलब्ध साठ्यानुसार नियोजन हाच पर्याय



**दुष्काळकळा**

» अर्चना काळे-पंडित

**भाग-१०**

खरीप हंगामात पावसाने दगा दिला, पिकांच्या उत्पादनाला फटका बसला आणि शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित उत्पन्न आले नाही. आता खरीप हंगामातील नुकसानीतून सावरण्याचा प्रयत्न सुरू असतानाच रब्बी हंगामाचे आव्हान समोर उभे आहे. जमिनीत पुरेसा ओलावा नाही, विहिरींची पाणीपातळी खालावली आहे आणि धरणांतील साठ्याकडेही काळजीपूर्वक पाहावे लागत आहे. अशा परिस्थितीत मागील वर्षी घेतलेले पीक यंदाही घ्यायचे की उपलब्ध पाण्याच्या मर्यादेनुसार पिकांची निवड बदलायची, हा प्रश्न मराठवाड्यातील शेतकऱ्यांसमोर आहे.

दुष्काळात केवळ पेरणी करणे महत्त्वाचे नसते, तर केलेली पेरणी उत्पादनापर्यंत पोहोचेल का, याचा अंदाज घेणे अधिक आवश्यक असते. पाणी उपलब्ध नसताना अधिक पाणी लागणारे पीक घेतल्यास बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर केलेला खर्च अडकण्याची शक्यता असते. त्याउलट जमिनीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता आणि पिकाची पाण्याची गरज यांचा विचार करून नियोजन केल्यास नुकसान मर्यादित ठेवण्याची संधी मिळू शकते. यंदाच्या दुष्काळाने मराठवाड्यातील शेतीला हाच धडा दिला आहे.मराठवाड्यातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाळा संपल्यानंतर रब्बी हंगामाचे नियोजन करताना प्रत्येक शेताची परिस्थिती वेगळी असणार आहे. काळी जमीन, मध्यम जमीन आणि हलकी जमीन यांची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वेगवेगळी असते. त्याचप्रमाणे विहीर, बोअरवेल, शेततळे किंवा अन्य जलस्रोत असलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती पूर्णपणे कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा वेगळी असते.त्यामुळे संपूर्ण गावाने किंवा परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी एकच पीक घ्यावे, असे नियोजन उपयोगाचे ठरणार नाही. आपल्या शेतात सध्या किती ओलावा आहे, उपलब्ध पाणी किती दिवस पुरू शकते, पिकाला किती वेळा पाणी द्यावे लागेल आणि त्या पिकातून अपेक्षित उत्पन्न किती मिळेल, याचा अंदाज घेणे आवश्यक आहे. पाण्याचा स्रोत असला, तरी त्यातून संपूर्ण हंगामाला पुरेल इतके पाणी मिळेलच, असे नाही.यंदा राज्यात पावसाची तूट आणि ऑगस्ट-सप्टेंबरमधील पावसाच्या खंडाचा परिणाम खरीप पिकांवर झाला आहे. त्यातच आठ ऑक्टोबरला हवामान विभागाने महाराष्ट्रातून मोसमी पावसाची माघार झाल्याचे जाहीर केले. त्यामुळे रब्बी हंगामातील पेरणी आणि पिकांच्या वाढीसाठी उपलब्ध जमिनीतील ओलावा महत्त्वाचा ठरणार आहे.

मराठवाड्यातील पारंपरिक रब्बी पिकांमध्ये ज्वारी, हरभरा आणि करडईला महत्त्व आहे. उपलब्ध ओलाव्यानुसार या पिकांचा विचार करता येऊ शकतो. मात्र, ही पिके कमी पाण्यात येतात म्हणून प्रत्येक शेतात ती हमखास चांगले उत्पादन देतील, असे नाही. पेरणीची वेळ, जमिनीचा प्रकार, बियाण्याची निवड आणि पिकाच्या वाढीच्या टप्प्यावर मिळणारा ओलावा यावर उत्पादन अवलंबून राहणार आहे. रब्बी ज्वारी हे मराठवाड्यातील अनेक भागांतील महत्त्वाचे पीक आहे. जमिनीत पुरेसा ओलावा असेल, तर स्थानिक परिस्थितीला अनुरूप वाणाची निवड करून ज्वारीची पेरणी करता येते. मात्र, जमिनीतील ओलावा अत्यल्प असेल आणि पुढील काळात पावसाची शक्यता नसेल, तर केवळ पारंपरिक पद्धतीने पेरणी करून उत्पादनाची अपेक्षा ठेवणे धोक्याचे ठरू शकते. अशा वेळी कृषी विभागाच्या स्थानिक मार्गदर्शनानुसार पेरणीचा निर्णय घेणे आवश्यक आहे.हरभरा हे तुलनेने कमी पाण्यात घेता येणारे महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्याची क्षमता चांगली असेल, तर हरभऱ्याचा पर्याय विचारात घेता येतो. मात्र, पेरणीपूर्वी जमिनीतील ओलावा आणि पुढील काळातील पाण्याची उपलब्धता तपासणे गरजेचे आहे. पिकाच्या महत्त्वाच्या वाढीच्या टप्प्यावर पाणी मिळणार नसेल, तर अपेक्षित उत्पादनावर परिणाम होऊ शकतो.करडई हेही मराठवाड्यासाठी महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. कमी पाण्याच्या परिस्थितीत त्याचा विचार करता येत असला, तरी स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार आणि बाजारपेठेतील मागणी यांचाही विचार करावा लागेल. विशेष म्हणजे, केंद्र सरकारने २०२७-२८ च्या रब्बी विपणन हंगामासाठी करडईची किमान आधारभूत किंमत प्रतिक्विंटल ७,२१५ रुपये निश्चित केली आहे. मागील हंगामाच्या तुलनेत त्यात ६७५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. मात्र, आधारभूत किंमत जाहीर होणे आणि शेतकऱ्याला प्रत्यक्षात त्या दराने विक्री करता येणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे पिकाची निवड करताना खरेदीची व्यवस्था आणि स्थानिक बाजारपेठेचाही विचार आवश्यक आहे.

#### पाणी असेल तेव्हाच गहू, कांदा आणि भाजीपाला

गहू, कांदा आणि भाजीपाला या पिकांमधून काही परिस्थितीत चांगले उत्पन्न मिळू शकते. मात्र, त्यासाठी आवश्यक पाणी आणि खर्चाची उपलब्धता असणे गरजेचे आहे. पाण्याचा स्रोत मर्यादित असताना केवळ बाजारभाव चांगला मिळेल या अपेक्षेने अशा पिकांची लागवड केल्यास उत्पादन खर्च वाढण्याबरोबरच पिके अर्धवट वाळण्याचा धोका असतो.विशेषतः विहिरीतील पाणीपातळी कमी झालेल्या शेतकऱ्यांनी संपूर्ण क्षेत्रावर एकाच वेळी पेरणी करण्याऐवजी उपलब्ध पाण्याचा हिशेब करून क्षेत्र निश्चित करणे आवश्यक आहे. काही क्षेत्रावर तुलनेने कमी पाणी लागणारे पीक आणि उर्वरित क्षेत्रात जमिनीतील ओलावा टिकविण्याच्या दृष्टीने नियोजन केल्यास जोखीम कमी करण्यास मदत होऊ शकते. अर्थात, कोणते पीक घ्यायचे आणि किती क्षेत्रावर घ्यायचे, याचा निर्णय स्थानिक कृषी सल्ल्यानुसारच घ्यावा. पाण्याचा वापर काटेकोरपणे करण्यासाठी ठिबक किंवा तुषार सिंचनासारख्या पद्धती उपयोगी ठरू शकतात. मात्र, या पद्धतींचा लाभ पिकाचा प्रकार, जमिनीची स्थिती, उपलब्ध पाण्याचे प्रमाण आणि सिंचन व्यवस्थेचा खर्च लक्षात घेऊनच ठरवावा लागतो. केवळ सिंचनाची आधुनिक यंत्रणा बसविल्याने पाण्याची समस्या सुटत नाही; उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजनही तितकेच महत्त्वाचे आहे.

#### शेतातील ओलावा टिकविणेही तितकेच महत्त्वाचे

दुष्काळानंतरच्या शेतीत पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच जमिनीत असलेला ओलावा टिकविणे महत्त्वाचे ठरते. बांधबंदिस्ती, समतल मशागत, पावसाचे पाणी शेतात मुरविण्याची व्यवस्था आणि जमिनीची धूप रोखणारे उपाय दीर्घकालीन दृष्टीने उपयुक्त ठरू शकतात. मात्र, या उपायांचा परिणाम जमिनीचा उतार, मातीचा प्रकार आणि पावसाच्या स्वरूपावर अवलंबून असतो. शेतातील पाणी वेगाने वाहून जाण्याऐवजी ते जमिनीत मुरावे, यासाठी शेताच्या रचनेनुसार उपाय करणे आवश्यक आहे. आधीपासून असलेल्या बांधांची दुरुस्ती, शेतातील पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने करणे आणि शक्य असेल तेथे पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था करणे यामुळे पुढील हंगामांसाठी काही प्रमाणात फायदा होऊ शकतो. मात्र, यंदा पाऊस संपल्यानंतर लगेचच अशा उपायांचा परिणाम दिसेल, अशी अपेक्षा न ठेवता त्याकडे दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून पाहावे लागेल. शेतकऱ्यांनी पीकनियोजन करताना कृषी सहाय्यक, कृषी अधिकारी आणि कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. जमिनीतील ओलावा, स्थानिक पर्जन्यमान, पिकाचा कालावधी आणि उपलब्ध बियाणे यांची सांगड घालून निर्णय घेतल्यास अनावश्यक खर्च टाळता येऊ शकतो.

#### शासनाच्या मदतीसोबत बाजारपेठेचे गणितही महत्त्वाचे

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पीकनिवडीसाठी मार्गदर्शन, योग्य बियाण्यांची उपलब्धता, जलसंधारणाच्या उपाययोजना आणि पीकविमा यांसारख्या बाबी महत्त्वाच्या ठरतात. मात्र, शेतकऱ्याने कोणते पीक घ्यावे, याचा निर्णय केवळ पाण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून नसतो. त्या पिकाला बाजारपेठेत मागणी आहे का, उत्पादनाला योग्य भाव मिळण्याची शक्यता किती आहे, काढणीनंतर साठवणुकीची सुविधा आहे का आणि विक्रीसाठी जवळची बाजारपेठ उपलब्ध आहे का, याचाही विचार करावा लागतो. किमान आधारभूत किमतीत झालेली वाढ शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरू शकते. मात्र, त्या दराने प्रत्यक्ष खरेदी होणे, खरेदी केंद्र वेळेवर सुरू होणे आणि शेतकऱ्याला विक्रीची संधी मिळणे या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. उत्पादन खर्च आणि संभाव्य उत्पन्न यांचा हिशेब न करता केवळ घोषित दराच्या आधारावर पीक निवडणे धोक्याचे ठरू शकते. यंदाच्या खरीप हंगामात अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. त्यामुळे रब्बी हंगामात मोठा खर्च करून तोट्याची जोखीम वाढविण्यापेक्षा उपलब्ध साधनसंपत्तीचा विचार करून मर्यादित आणि नियोजनबद्ध शेती करणे आवश्यक आहे. पीकविमा, कर्ज पुनर्गठन किंवा अन्य शासकीय मदतीची पात्रता असेल, तर संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्याबरोबरच पुढील हंगामाच्या खर्चाचे नियोजनही करावे लागेल.

#### पाणी आधी, 'पीक नंतर' हाच यंदाचा मंत्र

मराठवाड्यातील दुष्काळाने पुन्हा एकदा पावसावर अवलंबून असलेल्या शेतीची मर्यादा स्पष्ट केली आहे. पाऊस कमी पडल्यावर केवळ पीक बदलणे पुरेसे नसते. पाण्याचे नियोजन, जमिनीतील ओलावा टिकविणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचा विचार, उत्पादन खर्चावर नियंत्रण आणि बाजारपेठेची माहिती या सगळ्या बाबींचा एकत्रित विचार करावा लागतो. प्रत्येक शेतकऱ्याची जमीन, पाण्याचा स्रोत आणि आर्थिक परिस्थिती वेगळी असल्यामुळे सर्वांसाठी एकच पीक हा उपाय ठरू शकत नाही. काही ठिकाणी रब्बी ज्वारी योग्य ठरेल, तर काही ठिकाणी हरभरा किंवा करडईचा पर्याय अधिक व्यवहार्य ठरू शकतो. पुरेसे पाणी असलेल्या शेतातच गहू किंवा अधिक सिंचनाची गरज असलेल्या पिकांचा विचार करणे हिताचे ठरेल. हा निर्णय घेताना स्थानिक कृषी तज्ज्ञांचा सल्ला महत्त्वाचा आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी पाऊस पडण्याची वाट पाहणे आपल्या हातात नाही; पण उपलब्ध पाण्याचा वापर कसा करायचा, कोणत्या पिकावर किती खर्च करायचा आणि उत्पादनाची जोखीम कशी कमी करायची, हे काही प्रमाणात आपल्या नियोजनातून ठरवता येते. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात जास्त क्षेत्र, 'जास्त उत्पादन' या पारंपरिक विचारापेक्षा उपलब्ध 'पाण्यात सुरक्षित उत्पादन' या दृष्टिकोनाला प्राधान्य द्यावे लागेल. दुष्काळानंतरची शेती सावरण्याची सुरुवात याच विचारातून होऊ शकते.

# संपादकीय

## लावणीच्या ठसक्याला विराम

महाराष्ट्राच्या लोककलेच्या परंपरेत काही कलाकार असे असतात, की त्यांची कला केवळ मनोरंजनापुरती मर्यादित राहत नाही, तर ती एका संस्कृतीची ओळख बनते. त्यांच्या अभिनयातून लोकजीवनातील सुख-दुःख, संघर्ष, भावभावना आणि जगण्याचे रंग उलगडत जातात. ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी कलावंत मधू कांबीकर या अशाच कलाकारांपैकी एक होत्या. त्यांच्या निधनाने मराठी चित्रपटसृष्टीबरोबरच लोककलेच्या क्षेत्रातील एक प्रभावी पर्व संपले आहे. वयाच्या ७३व्या वर्षी त्यांनी घेतलेली एक्झिट ही केवळ एका कलाकाराची एक्झिट नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वातील एका अस्सल कलावंताचा निरोप आहे.मधू कांबीकर यांचे नाव घेताच डोळ्यांसमोर उभी राहते ती लावणीची ठसकेबाज अदा, अभिनयातील सहजता आणि भूमिकेत जीव ओतण्याची विलक्षण ताकद. लावणी हा महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. मात्र, या कलेला अनेकदा केवळ मनोरंजनाच्या चौकटीत बंदिस्त केले जाते. तिच्यामागची परंपरा, लोकजीवनाशी असलेले नाते, त्यातील आशय आणि सादरीकरणासाठी लागणारे कौशल्य यांकडे दुर्लक्ष होते. अशा परिस्थितीत लावणीला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या आणि आपल्या अभिनयाने तिचे सामर्थ्य अधोरेखित करणाऱ्या कलावंतांचे योगदान महत्त्वाचे ठरते. मधू कांबीकर यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून ही परंपरा समृद्ध केली.लोककलेतील कलाकाराचे जगणे सोपे नसते. एका बाजूला प्रेक्षकांची दाद, टाळ्यांचा कडकडाट आणि लोकप्रियतेचा आनंद असतो, तर दुसऱ्या बाजूला कलेसाठी घेतलेले कष्ट, सातत्याने करावी लागणारी साधना आणि बदलत्या काळाशी जुळवून घेण्याचे आव्हान असते. चित्रपटसृष्टीतही काळानुसार विषय, अभिरुची आणि अभिनयाच्या शैली बदलत असतात. अशा प्रवाहात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे आणि ती टिकवून ठेवणे ही मोठी कसोटी असते. मधू कांबीकर यांनी आपल्या अभिनयातून ही ओळख निर्माण केली. लोककलेतील अनुभव आणि चित्रपटांतील अभिनय यांचा संगम त्यांच्या कलाप्रवासाचे वैशिष्ट्य ठरला.मराठी चित्रपटसृष्टीने ग्रामीण जीवन, माणसांचे स्वभावविशेष, सामाजिक विषमता आणि मानवी नात्यांतील गुंतागुंत यांचे चित्रण करताना लोककलेचा मोठ्या प्रमाणावर आधार घेतला आहे. तमाशा, लावणी आणि लोकनाट्य या कलाप्रकारांनी मराठी चित्रपटांना केवळ रंगत दिली नाही, तर समाजाचे वास्तव मांडण्याची ताकदही दिली. या परंपरेतील कलाकारांनी पडद्यावर साकारलेल्या भूमिका अनेकदा समाजाच्या सामूहिक स्मृतीचा भाग बनल्या. मधू कांबीकर यांच्यासारख्या कलावंतांचे महत्त्व याच संदर्भात लक्षात घ्यावे लागते. त्यांचे योगदान केवळ त्यांनी साकारलेल्या भूमिकांपुरते मर्यादित नसून, लोककलेचा वारसा पुढे नेण्याशीही जोडलेले आहे.आज मनोरंजनाची साधने बदलली आहेत. दूरचित्रवाणी, चित्रपटगृहे आणि भ्रमणध्वनीवरील दृश्य माध्यमांमुळे प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचे मार्ग विस्तारले आहेत. मात्र, या बदलत्या विश्वात पारंपरिक लोककलांचे स्थान काय, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा बनला आहे. नव्या पिढीला लावणीची ओळख अनेकदा तिच्या चकचकीत सादरीकरणातून होते; परंतु या कलेचा इतिहास, तिचे सांस्कृतिक महत्त्व आणि त्यासाठी कलाकारांनी केलेली तपश्चर्या यांची ओळख किती होते? एखाद्या ज्येष्ठ कलावंताच्या निधनानंतर व्यक्त होणारा शोक आणि वाहिली जाणारी श्रद्धांजली यापलीकडे जाऊन आपण त्यांच्या कलेचे जतन करण्यासाठी काय करतो, याचा विचार करण्याची वेळ अशा प्रसंगी येते.

'सह्याद्री'च्या कुशीत

संयोजक: श्री प्रकाश जडे

# खिरापत....





प्रणाली देशमुख
अमरावती

पाचची घंटा झाली शाळा सुटली की दप्तर पाठीवर अडकवून घराच्या दिशेनं येताना पायात भिंगऱ्या लावल्या की काय इतका वेग वाढायचा चालताना चालणं कसलं एकदा सुसाट पळत सुटलं की थेट वळणावर असणाऱ्या चक्की जवळून यु टर्न घेत,घराच्या कोपऱ्यावर ब्रेक लावायचा. भरभर पायऱ्या चढून माजघरात दप्तर ठेवलं अन् हात पाय धुऊन कपडे बदलून गुलबक्षीची फुले आणायची घाई , तो रंग जाम आवडायचा मला... गुलाबी ,लाल ,जांभळा ह्या तिन्ही रंगाचं एकत्रीकरण म्हणजे गुलबक्षी..

लांब दांडी आणि नाजूक पाकळ्यांची फुलं सुगंधी नसली तरी भुलाबाईला चालायचीयामध्ये पांढऱ्या रंगाची थोड्या शेडिंगची फुलं पण असायची, अंधार पडायच्या आधी परडीभर फुलं आईला दिल्यावर ,आई वेणी गुंफतात तसा हार करायची. माझ्या लाडक्या भुलाबाई साठी.भुलोजी भुलाबाई म्हणजे शंकर-पार्वती प्रतिमात्मक मातीच्या मूर्ती. याला गुण भोंडलाही म्हणतात जो भाद्रपद पौर्णिमेपासून शरद पौर्णिमेपर्यंत साजरा केला जातो. ओसरीतल्या कोनाड्यात थोडी सजावट करून भुलोजी भुलाबाई विराजमान व्हायचे सोबतच एक छोटा पाळणा त्यांच्या बाळासाठी, आजूबाजूलाआणखी काही सजावटीच्या वस्तू ठेवून तो कोनाडा आणखीच देखणा दिसायचा. बस हेच एक कारण होतं की १० दिवस भुलाबाई समोर गाणी म्हणायची आहे आणि शाळा सुटली की थेट एक मिनिट ही इकडे तिकडे न घालवता घरी पळत सुटायचं. आई रोज दुपारीच नवीन खिरापत तयार करून




ठेवायची जी कुणाला ओळखता येणार नाही . आणि आपल्या घरची खिरापत कोणीच ओळखू शकत नाही ह्याचंही अप्रूप वाटायचं मला त्यावेळी,खिरापत म्हणजे प्रसादाचा खाऊ,हा बंद डब्यात ठेवायचा आणि तो डबा हलवायचा त्याच्या आवाजावरून मुली ओळखायच्या आत काय आहे ?पण यामध्येही युक्त्या वापरल्या जायच्या जसे की शंकरपाळी असेल तर खुळखुळ आवाज येऊ नये म्हणून डब्यात डबा फसवून थोडी फसवेगिरी करायची ... कधी पदार्थाच्या वासावरूनही थोडीफार हिंट मिळायची. किंवा किराण्याच्या दुकानातून काही आणताना जर कुणी पाहिलं तर तोही तर्क लावला जायचा.मुलींच्या घोळक्यात मीही सामील होऊन त्यांच्या घरी गाणी म्हणायला जायचे. गाणी पाठ असली तरीही ,कच्च लिंबू म्हणून कुणी तसं सिरीयसली घेत नव्हतं , जवळपास सगळ्या पोरी माझ्यापेक्षा वयानी मोठ्या होत्या...मी चौथी पचवित असेल बहुतेक.आपण गेलो तर त्याही आपल्याकडे येतील म्हणजे ते तसंच होतं आपण ज्यांच्याकडे गाणी म्हणायला जातो तेच आपल्याकडे येतात ,असाच नियम होता त्यांचा. त्या पोरी सारख्या म्हणायच्या आता किनई, तुझ्या घरी जाऊया आणि दुसऱ्या घरी निघून जायच्या असं करता करता सर्वांच्या घरी गाणी म्हणता म्हणता मुली कमी कमी होत जायच्या मग शेवटची जी घरं राहायची त्यांच्याकडे, आता खूप उशीर झाला म्हणून आपण आज पाचच गाणी म्हणुया उद्याला तुझ्याकडे आधी येऊ असं म्हणत मन समजावणी करायच्या.आपण आधी दहा पंधरा घरी गाणी म्हंटली अगदी अ पासून ज्ञ पर्यंत... आणि आपल्याकडे आल्यावर ह्या पोरी रोज शॉर्टकट मारतात . म्हणतात कारल्याची बी खूप खूप मोठं आहे आपण दुसरं म्हणू... दोन गाणी झाली की लगेच अडकित जाऊ खिडकीत जाऊ शेवट करायच्या, आणि का तर आपण लहान आहोत आपल्याला काही कळत नाही म्हणून ,खूप वाईट वाटायचं . एक दिवस तर शेवटचं माझं घर होतं आणि कुणीही आलं नाही , हिरमुसला चेहरा करून घरी आल्यावर आईला सांगितलं, आज कुणीच नाही आलं,आई म्हणाली चल आपणच आज गाणी म्हणुया , मग मायलेकींनी मनसोक्त भुलाबाईची गाणी म्हटली.आणि त्यादिवशीची खिरापत मी एकटीने संपवली... तशी लहान बहीण आणि भाऊ पण होते पण पुन्हा तेच ती दोघंही माझ्यापेक्षा लहान म्हणजे कच्च लिंबू मी पण त्यांना सिरीयसली घेतलं नाही.

# 'हे' पाणी बीपी, कोलेस्ट्रॉल आणि मधुमेहासारख्या अनेक समस्यांवर नियंत्रण ठेवू शकते, कसे ते जाणून घ्या?

हाय ब्लड प्रेशरला हायपरटेंश देखील म्हटले जाते. हाय ब्लड प्रेशरमुळे हृदयाशी संबंधित समस्या आणि स्ट्रोकचा धोका निर्माण होऊ शकतो. म्हणून, जर या समस्या टाळायच्या असतील तर नियमितपणे रक्तदाब तपासणे गरजेच आहे. यामुळे अनेक आरोग्य समस्या टाळता येऊ शकतात. आजकाल बरेच लोक उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. रक्तवाहिन्यांमधील रक्तदाब सामान्यपेक्षा सातत्याने जास्त असताना ही समस्या उद्भवते. याचा अर्थ असा की रक्तवाहिन्यांवर जास्त दाब असतो, ज्यामुळे हृदयाला रक्त पंप करण्यासाठी जास्त काम करावे लागते.हाय ब्लड प्रेशरची लक्षणं लगेच दिसून येत नाहीत म्हणून वर्षातून किमान एकदा तरी रक्तदाब तपासणे महत्वाचे आहे. तसंच उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी, आपण निरोगी जीवनशैली स्वीकारली पाहिजे आणि नियमित व्यायाम केला पाहिजे. याव्यतिरिक्त, आपण खात असलेल्या अन्नामुळे वजन वाढणार नाही याची खात्री केली पाहिजे. तणावाचे व्यवस्थापन केलं पाहिजे तसंच चांगली झोप घेणे देखील महत्त्वाचे आहे. रक्तदाब नियंत्रित ठेवल्याने, हृदयविकार, स्ट्रोक आणि स्मृतिभ्रंश यासारख्या आरोग्य समस्या टाळता येऊ शकतात. परंतु काही घरगुती उपाय केल्यास उच्च रक्तदाब लक्षणीयरीत्या कमी करता येऊ शकते. यापैकी एक म्हणजे धणे पाणी जे औषधापेक्षा कमी नाही. पोषणतज्ञ लवनीत भत्रा यांच्या मते, धणे पाणी पिल्याने उच्च रक्तदाब कमी होण्यास मदत होते.उच्च रक्तदाबासाठी धणे पाणी कसे उपयुक्त आहे? धणे पाणी उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. धण्यामध्ये हृदयासाठी निरोगी फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. त्यात नैसर्गिक मूत्रवर्धक गुणधर्म देखील आहेत, जे शरीरातून अतिरिक्त सोडियम काढून टाकण्यास मदत करतात आणि ते पोटॅशियममध्ये समृद्ध आहे. धणेमधील कॅल्शियम आयन रक्तवाहिन्यांवरील ताण कमी करण्यासाठी उत्तम आहे. शिवाय, ते योग्य आतड्यांचे कार्य राखण्यास देखील मदत करते, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रण सोपे होते. धणे पाण्यात व्हिटॅमिन के, पोटॅशियम आणि मँगनीज असतात, जे निरोगी रक्तदाबात योगदान देतात. हे पाणी पिल्याने रक्तदाब कमी होण्यास मदत होऊ शकते. धने पाण्याचे फायदे: धणे शरीराची पचनसंस्था, रक्तातील साखर, यकृत आणि मूत्रपिंडाचे कार्य सुधारते. त्याचे अँटिऑक्सिडंट आणि डिटॉक्सिफायिंग गुणधर्म शरीराला आतून स्वच्छ करण्यास मदत करतात. धणे जीवनसत्त्वे अ, क आणि के यासह आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध आहे. पचनाच्या समस्या दूर: धण्याचं पाणी पिल्यास पचनाच्या समस्या दूर होण्यास मदत होते . यामुळे आम्लपित्त, गॅस, बद्धकोष्ठता आणि पोटफुगी यासारख्या पचनाच्या समस्यांवर नियंत्रण मिळते. जेवल्यानंतर पोटफुगीचा त्रास जाणवत असेल ते नियमितपणे कोथिंबीरीचे पाणी पिऊ शकतात. यामुळे औषधांची गरज न पडता पचनाच्या बहुतेक समस्या दूर होण्यास मदत होते. यकृताचे कार्य सुधारते: धण्यामधील अँटीऑक्सिडंट आणि डिटॉक्सिफायिंग गुणधर्म यकृताला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करतात. धण्याचं पाणी यकृतातील विषारी पदार्थ काढून टाकतो. तसंच यामुळे जळजळ कमी होते. परिणामी यकृताचे कार्य सुधारते. शिवाय, धण्यामधील अँटीऑक्सिडंट शरीरातील विषारी पदार्थ देखील कमी करतात.कोलेस्ट्रॉल कमी: धने पाणी शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे. त्याच्या दाहक-विरोधी गुणधर्मामुळे, ते शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल लक्षणीयरीत्या कमी करते. तसंच हे पाणी वजन कमी करण्यास देखील मदत करते, इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते. धण्यातील जीवनसत्त्वे अ, क आणि के केस गळतीची समस्या देखील दूर करण्यास उत्तम मानले जाते.कसे तयार करावेधणे पाणी अनेक प्रकारे तयार करता येते. एक मार्ग म्हणजे एक ग्लास पाण्यात एक चमचा धणे घालून ते रात्रभर भिजत ठेवा आणि सकाळी ते पाणी प्या. किंवा पाणी उकळून चहासारखे प्या. तसंच, धणे बारीक करून त्याचे पावडर तयार करा आणि गरम पाण्यात मिसळून प्या.

# दुष्काळावर मात:हवी सर्वांची साथ

महाराष्ट्रात पावसाचा खंड आणि पिकांचे नुकसान पाहून राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ नुसार दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहिर करुन त्या भागातील दुष्काळावर मात करण्यासाठी १२ उपाययोजनांची अंम लबजावणी सुरु केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकरी-नागरिकांना सहाय्य करुन दुष्काळावर मात करायची आहे यासाठी सर्वांची भक्कम साथ अत्यंत महत्त्वाची आहे.

महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हा प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहे. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पुर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंद्याच्या खरीप हंगामा पासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे. पावसाचे प्रमाण, पावसातील तूट आणि पाऊस पडण्यातील मोठा खंड यावर आधारित ट्रिगर – १ म्हणजे प्रथम कळ लागू करण्यात आली आहे. दुष्काळ जाहिर करण्याच्या प्रक्रियेतील ही पहिली पायरी आहे.

**शेतकऱ्यांना कोणत्या सवलती ?**

ट्रिगर-१ लागू झाल्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांना विविध सवलती व उपाययोजना लागू करता येतात. मात्र, या सवलती आपोआप सर्वांना मिळतात असे नाही. संबंधित विभागांकडून शासन निर्णयानुसार त्यांची अंमलबजावणी केली जाते. त्यानुसार दुष्काळ सदृष्य पारिस्थिती जाहिर झालेल्या भागात खालीलप्रमाणे १२ उपाययोजना राबविण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. (१) जमीन महसुलात सवलत : दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सवलत देण्याची तरतूद आहे. (२) पीक कर्जाचे पुनर्गठन : शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याची प्रक्रिया केली जाऊ शकते. (३) कर्जवसुलीस स्थगिती : शेती कर्जाच्या वसुलीला ठरावीक कालावधीसाठी स्थगिती देता येते. (४) वीजबिलात सवलत : दुष्काळग्रस्त भागातील कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलतीच्या उपाययोजना करता येतात. (५) परीक्षा शुल्कमाफी : दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत किंवा माफी देण्याची तरतूद आहे. (६) टँकरने पाणीपुरवठा : पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करता येतो. (७) चारा उपलब्धता : पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी चारा छावण्या किंवा अन्य उपाययोजना करता येतात. (८) रोजगाराच्या कामांना चालना : दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत गरजेनुसार कामे सुरू करता येतात. (९) पिण्याच्या पाण्याला प्राधान्य : उपलब्ध पाणीसाठ्यातून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची व्यवस्था केली जाते. (१०) पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती : पाणीपुरवठा योजनांच्या तातडीच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाऊ शकते. (११) वीजपुरवठा खंडित न करण्याच्या उपाययोजना : दुष्काळग्रस्त भागातील पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाय करता येतात. (१२) पीक नुकसानीसाठी स्वतंत्र मदत : पीक नुकसानभरपाई ही ट्रिगर-१ लागू झाल्याने थेट मिळत नाही. त्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे आणि शासनाने निश्चित केलेले मदतीचे स्वतंत्र निकष लागू राहतात. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी मदत देण्याची स्वतंत्र प्रक्रिया मदत व पुनर्वसन विभागाने नमूद केली आहे.राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यात दुष्काळ, याचा अर्थ ७५ टक्के महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुष्काळाची दाहकता अनुभवत असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झाल्याने आता दुष्काळाच्या विविध उपाययोजना जाहीर होऊन त्यांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यावर पंचनाम्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.महाराष्ट्रातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी ट्रिगर-१ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एखाद्या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे का, हे तपासण्यासाठी शास्त्रीय निकषांवर आधारित तीन टप्प्यांच्या मूल्यमापनातील हा पहिला टप्पा आहे. महाराष्ट्र शासनाच्या जून २०१८ मधील सुधारित शासननिर्णयानुसार, मान्सून कालावधीत ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या किंवा पावसाचा प्रदीर्घ खंड पडलेल्या भागात दुष्काळ व्यवस्थापनातील पहिली धोक्याची सूचना म्हणून ट्रिगर-१ लागू केला जातो. ट्रिगर-१ लागू झाला म्हणजे थेट पूर्ण दुष्काळ घोषित होत नाही. यानंतर प्रशासकीय पातळीवर दुष्काळ निवारणाची प्रक्रिया सुरू होते.ट्रिगर-१ च्या अहवालानंतर राज्य शासन प्रभावित तालुक्यांमध्ये पिण्याचे पाणी, चारा छावण्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) कामे आणि शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्याचा मार्ग मोकळा करते. शासकीय नियमांनुसार, ट्रिगर-१ ची अंमलबजावणी झाल्यानंतर पुढील टप्प्यात उपग्रह निर्देशांक, जमिनीतील ओलावा आणि भूजल पातळी यांसारख्या घटकांचे मूल्यांकन करून ट्रिगर-२ चा आढावा घेतला जातो. त्यानंतर निवडक गावांमध्ये प्रत्यक्ष पीक पंचनामे करून शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीपेक्षा जास्त नुकसान आढळल्यास ती गावे अधिकृतपणे दुष्काळ घोषित करण्यास पात्र ठरतात.

राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठा खंड दिल्याने अनेक भागांमध्ये पिकांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून दुष्काळसदृश परिस्थितीचा प्राथमिक आढावा घेतला जात आहे. पाहणी दौरा केला जात आहे. दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून पंचनाम्याचे आदेश देण्यात आले असून त्रिस्तरीय समिती पंचनामे करणार आहे. या समितीमध्ये तलाठी,कृषी सहायक व ग्रामसेवक यांचा समावेश असून ते गाव पातळीवर पंचनामे करणार असल्याची माहिती आहे.

२६५ तालुके दुष्काळाच्या छायेत

पश्चिम विदर्भ म्हणजे अमरावती विभागात ५ जिल्हे येतात. त्यानूसार सर्व ५६ तालुके दुष्काळाच्या छायेत आले आहेत त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद, संग्रामपूर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, सिंदखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापूर, मोताळा व नांदुरा; अमरावती जिल्ह्यातील अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरूड, मोर्शी, चांदूरबाजार व दर्यापूर; अकोला जिल्ह्यातील अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर व बार्शीटाकळी; वाशिम जिल्ह्यातील वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा व मानोरा; तसेच यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी-जामणी, केळापूर, घाटंजी व राळेगाव या तालुक्यांचा समावेश आहे. या सर्व ५६ तालुक्यांना प्रथम कळ (ट्रिगर -१) लागू करण्यात आला आहे. याप्रमाणे राज्यातील २६५ तालुके समाविष्ट आहेत. दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी बारा उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.'पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले आहेत. सर्व्हेक्षण करताना पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑर्डिनेटद्वारे पिक परिस्थितीचा अहवाल सादर केला जाणार आहे. राज्याचे कृषि आयुक्त यांनी खरीप २०२६च्या हंगामाचा आढावा घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता या राज्यातील तालुक्यामध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत दुष्काळाबाबतच्या ऊीगी- १ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर, धाराशिव,सोलापूर, वाशिम जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव, मोताळा, अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील गावांना भेटी देऊन पाहणी केली आणि बळीराजाला धीर दिला.तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करीत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे.राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासकीय अहवाल आणि आकडेवारी पुरेशी नसते. शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. विशेषत: धाराशिव व वाशिम जिल्ह्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे तो पिण्याच्या पाण्याचा. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यादरम्यान स्पष्ट केले. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था केली जाणार आहे. दुष्काळाची झळ केवळ शेतीला बसत नाही, तर त्याचा परिणाम कुटुंबाच्या रोजच्या गरजांवरही होतो. त्यामुळे पाणी, चारा आणि अन्नधान्य या मूलभूत गरजांचा एकत्रित विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. मदत जाहीर झाल्यानंतर ती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे असते. या दृष्टीने शेतकऱ्यांना थेट मदत त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल आणि शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेताना पीक विमा, आपत्ती निवारणाच्या तरतुदी आणि शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या मदतीचाही विचार केला जात आहे. बाधित भागातील वस्तुस्थिती, पिकांचे नुकसान आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील मदतीबाबत निर्णय घेतले जात आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली मदत वेळेत मिळणे आणि त्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया सुलभ राहणे महत्वाचे ठरते.शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. फक्त यासाठी सर्वांची साथ हवी आहे.

– अनिल आलुरकर

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
KADIR KHAN PATHAN
TO
(NEW NAME)
PATHAN KADIRKHAN AMIRKHAN
AS PER MY DOCUMENTS
ADD: GALLI NO 2 SHATABDI NAGAR, PLOT NO 18-19
S NO 11593 NEW RASHIDPURA AURANGABAD,
AURANGABAD, AURANGABAD, MAHARASHTRA- 431061

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
1) MEHWISH KHAN MOHAMMAD HUZAIF
2) KHAN MEHVISH YAHYA
TO
(NEW NAME)
MEHWISH KHAN HUZAIF KHAN
AS PER MY DOCUMENTS
ADD: PLOT NO 23, NAGSEN COLONY JINSI,
OPP BILAL MASJID, AURANGABAD(MH)-431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
RIZWANA BEGUM
TO
(NEW NAME)
RIZWANA BEGUM MASUDKHA PATEL
AS PER MY DOCUMENTS
ADD: 3-7-14, ROHILA GALLI ASHOK NAGAR
JALNA, POST JALNA, DIST JALNA

DATE:12/10/2026
दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
BABBU MUSA SHAIKH
TO
(NEW NAME)
SHAIKH BABBU S HAIKH MUSA
AS PER MY DOCUMENTS
ADD: NEAR AL SABA CAFE SHARIF COLONY,
ROSHAN GATE, AURANGABAD MAHARASHTRA, 431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I AM CHANGING MY NAME FROM
1) TANSNEEN BEGUM KHALEEL KHAN
2) TASNEEM
3) TASNEEM KHALIL KHAN
TO
TASNEEM BEGUM KHALIL AHMED KHAN
FOR ISSUANCE OF PASSPORT
ADDRESS-LANE.NO.1 NEHRU NAGAR BABER COLONY
HATTISINGPURA KAT KAT GATE AURANGABAD MS 431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I AM CHANGING MY NAME FROM
RUKKSAR KUTUB KHAN
TO
KHAN RUKHSAR KUTUB
FOR ISSUANCE OF PASSPORT
ADDRESS-B.NO.B/4 SBH COLONY HIMAYAT
BAGH N-12 CIDCO AURANGABAD MS 431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I AM CHANGING MY NAME FROM
1) KUTUB KHAN
2) KHAN KUTUBUDDIN
TO
KHAN KUTUB MOHAMMED NIZAMUDDIN
FOR ISSUANCE OF PASSPORT
ADDRESS: B.NO.B/4 SBH COLONY HIMAYAT
BAGH N-12 CIDCO AURANGABAD MS 431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
WE THE PARENTS RIZWANA, KHAN KUTUBUDDIN,
CHANGING MY CHILDS NAME FROM
MOHAMMED MUSBAH
TO
MOHAMMED MISBAH KHAN KUTUB
FOR ISSUANCE OF PASSPORT
ADDRESS:PLOT.NO.2 B-4 N-12 SBH COLONY
HIMAYAT BAGH AURANGABAD MS 431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I AM CHANGING MY NAME FROM
MIRZA RAISEBEG FULBEG
TO
MIRZA RAISBEG FULBEG
FOR ISSUANCE OF PASSPORT
ADDRESS: NEAR SHOUKATIYA MASJID AZAD
NAGAR CHIKALTHANA AURANGABAD MS 431007

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I AM CHANGING MY NAME FROM
1) RIZWANA KUTUB KHAN
2) RIZWANA KHAN
TO
RIZWANA KHAN KUTUBUDDIN
FOR ISSUANCE OF PASSPORT
ADDRESS: B.NO.B/4 SBH COLONY HIMAYAT
BAGH N-12 CIDCO AURANGABAD MS 431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
HIDAYAT SIDDIQUI
TO
(NEW NAME)
HIDAYAT MUSHTAQ SIDDIQUI
AS PER MY DOCUMENTS
ADD: H NO 8-10-226, BEHIND AMC SCHOOL NO 3, YUNUS
COLONY C. SAMBHAJI NAGAR (AURANGABAD) -431001

दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
MOHAMMAD HUZAIF
MOHAMMAD YUSUF KHAN
TO
(NEW NAME)
MOHAMMAD HUZAIF KHAN
AS PER MY DOCUMENTS
ADD: OPP BILAL MASJID, PLOT NO-23 NAGSEN
COLONY JINSI,AURANGABAD (MH)-431001

कमजोरी लपविल्याने वाढत जाते
नस,कमजोरी,शिघ्रपतन,हस्तमैथून, स्वप्नदोष,
शुक्रजंतू कमी,लघवीतून वीर्य जार्णे, पांढरेपदर,
वांझपणा असल्यास भेटा.दर रविवारी मोफत
तपासणी शिबिर,३३ वर्षात एक लाख साठ
हजार नविन रूग्णांचा अनुभव.
डॉ.शेख (१५० पुरस्कारांनी सन्मानित)
वेळ स.१० ते २,दु.४ ते ९

डॉ.ए.एच.शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेंसरी (रजि.)
सेंट्रल बसस्टँण्ड,सिद्धार्थ गार्डनसमोर होटल मिर्झा
जवळ,औरंगाबाद

अल्पदरात जाहिरात प्रसिद्ध केल्या जातील
जाहिर प्रगटन,धर्मादाय आयुक्त जाहिरात,
वाढदिवस,पासपोर्टसाठी चेंज ऑफ नेम,
आदी जाहिरातीसाठी संपर्क साधावा.
जाहिरातीसाठी संपर्क
मो. 9545119917
7709193786

टी.सी.हरवली आहे
**शेख सुफी शेख इफ्तेखार,** मुजफ्फर नगर औरंगाबाद यांची डॉ.रफिक जकरीया कॅम्पस, मौलाना आझाद कॉलेज रोजाबाग या कॉलेजची बी.एस्सी.तिसरे वर्षाची टी.सी.मुजफ्फर नगर ते चाउस कॉलनी प्रवासादरम्यान गहाळ झाली आहे.कोणास सापडल्यास खाली दिलेल्या नंबरवर संपर्क साधावा.
संपर्क
शेख सुफी शेख इफ्तेखार
मो.नं.९१५६४७५६५६

## पोषण आहार प्रदर्शन, जनजागृतीपर पथनाट्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**मुंबई :** पोषणाचा अधिकार, सुदृढ भारताचा आधार' या संकल्पनेतून एकात्मिक बाल विकास सेवा योजना, चांदिवली प्रकल्पांतर्गत असल्फा, नारायणनगर बीट क्रमांक ५ आणि नौपाडा बीट क्रमांक ६ येथे नववा राष्ट्रीय पोषण माह उत्साहात साजरा करण्यात आला. पोषण आहाराचे महत्त्व, कुपोषण प्रतिबंध, माता व बाल आरोग्य तसेच शासकीय योजनांची जनजागृती करण्यात आली.

DATE: 12/10/2026
दैनिक सह्याद्री टाइम्स
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
SAEED KHAN
BADESHAH KHAN
TO
(NEW NAME)
SAYEED KHAN
BADESHAH KHAN
AS PER MY DOCUMENTS
ADD: RH NO -8,GUT NO-28,
SHILP NAGAR, SATARA PARISAR,
AURANGABAD-431001

# सेवा संकल्प अभियानात ५ हजार ६६६ बालकांच्या जन्माची नोंद

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** बालकांच्या जन्माची नोंद वेळेत व्हावी आणि जन्मनोंदणीची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, यासाठी जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या सेवा संकल्प' अभियानाला प्रतिसाद मिळाला. १७ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या २३ दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यात एकूण ५ हजार ६६६ बालकांच्या जन्माची नोंद करण्यात आली. यामध्ये ग्रामीण भागातील १ हजार २२२, तर शहरी भागातील ४ हजार ४४४ बालकांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेच्या जन्म-मृत्यू विभागाचे जिल्हा निबंधक डॉ. अभय धानोरकर यांनी ही माहिती दिली. जन्म प्रमाणपत्र हे बालकांच्या शैक्षणिक प्रवेशासह विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे, ओळखपत्र मिळविणे, पारपत्र काढणे आणि इतर कायदेशीर प्रक्रियांसाठी महत्त्वाचे दस्तऐवज आहे. त्यामुळे जन्माची नोंद वेळेत होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने जिल्ह्यात हे अभियान राबविण्यात आले.अभियानाच्या कालावधीत नोंदविण्यात आलेल्या एकूण जन्मांपैकी ४ हजार ६४७ बालकांच्या जन्माची नोंद जन्मानंतर निर्धारित २१ दिवसांच्या आत करण्यात आली. एकूण नोंदणीच्या तुलनेत हे प्रमाण ८२.०२ टक्के आहे. जन्मानंतर वेळेत नोंदणी झाल्यास पालकांना पुढील प्रक्रियेसाठी अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागत नाही. तसेच उशिराने जन्मनोंदणी करण्याच्या प्रकरणांची संख्याही कमी होण्यास मदत होते.या अभियानात नवीन जन्मनोंदणीसोबतच जुन्या नोंदी अद्ययावत करण्यावरही भर देण्यात आला. ॲड ओल्ड' या पर्यायाद्वारे प्राप्त झालेल्या जुन्या जन्मनोंदणीच्या प्रलंबित नोंदी पूर्ण करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर करण्यात आली. सांख्यिकी अन्वेषक सानिया सय्यद आणि सांख्यिकी पर्यवेक्षक राजेंद्र लांधी यांनी या कामात योगदान दिले. जन्म-मृत्यू नोंदणी कायद्यानुसार बालकाच्या जन्माची नोंद निर्धारित मुदतीत करणे आवश्यक आहे. यासाठी पालकांनी संबंधित ग्रामपंचायत, नगर परिषद, महानगरपालिका किंवा आरोग्य विभागाच्या नोंदणी केंद्राशी संपर्क साधावा.

# बनावट ई-मेल, ओटीपीद्वारे २.६८ कोटींची हेराफेरी

## कंपनीच्या मनुष्यबळ विभागातील कर्मचाऱ्यावर आरोप; वडील आणि भावाला अटक

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : बनावट ई-मेल आणि ओटीपीचा वापर करून खासगी कंपनीतील २ कोटी ६८ लाख रुपयांची हेराफेरी केल्याचा प्रकार छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडकीस आला आहे. उस्मानपुरा येथील आरएन लिमिटेड या कंपनीत मनुष्यबळ विभागात कार्यरत असलेल्या नितीन कुमार याच्यावर हा गंभीर आरोप आहे. या प्रकरणाच्या तपासादरम्यान छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी बिहारमधून त्याचे वडील गोपाल सिंह आणि भाऊ निकेश कुमार यांना अटक केली.**

न्यायालयाच्या आदेशानंतर दोघांना पुढील तपासासाठी महाराष्ट्रात आणण्यात आले आहे.पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार, कंपनीचे मालकांनी उस्मानपुरा पोलिस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली होती. नितीन कुमार याने कंपनीतील लेखापालाच्या नावाने बनावट ई-मेल खाते तयार केले. तसेच, त्यांच्या नावाने आर्थिक व्यवहारांसाठी आवश्यक असलेला मागणी अर्जही तयार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर कार्यालयप्रमुख एम. एम. ओझा यांच्याकडून ओटीपी मिळवून त्याने कंपनीच्या आर्थिक व्यवहारांवरील अधिकार मिळवले.

**२१ बँक खात्यांमध्ये रक्कम वळवली**

आर्थिक व्यवहारांचे अधिकार मिळाल्यानंतर नितीन याने कथितरीत्या कंपनीच्या खात्यातील रक्कम स्वतःच्या वडिलांसह भाऊ, बहीण आणि इतर नातेवाइकांच्या बँक खात्यांमध्ये वळवली. अशा प्रकारे एकूण २१ बँक खात्यांमध्ये २ कोटी ६८ लाख रुपये हस्तांतरित केल्याचा आरोप आहे. या आर्थिक गैरव्यवहाराची माहिती समोर आल्यानंतर आरोपीच्या वडिलांनी कंपनीच्या खात्यात ७ लाख १० हजार रुपये परत जमा केले. उर्वरित रक्कमही परत करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, उर्वरित रक्कम परत मिळाली नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

**सर्व्हरमधील माहिती हटवून पलायन**

कंपनीतील आर्थिक गैरव्यवहार उघडकीस येण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर नितीन याने कंपनीच्या सर्व्हरमधील संपूर्ण माहिती हटवली आणि तेथून पलायन केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे शोधमोहीम सुरू केली. त्यानंतर नितीनचा भाऊ निकेश कुमार ऊर्फ बजरंगी याला मुजफ्फरपूर येथून ताब्यात घेण्यात आले. पुढे त्याचे वडील गोपाल सिंह यांनाही बिहारमधील शिवहर जिल्ह्यातील तरियानी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नरवारा चौकातून अटक करण्यात आली.दोन्ही आरोपींना न्यायालयाकडून संक्रमण कोठडी मंजूर झाल्यानंतर महाराष्ट्र पोलिसांनी त्यांना पुढील तपासासाठी महाराष्ट्रात आणले आहे. या आर्थिक गैरव्यवहारात अन्य कोणाचा सहभाग आहे का, तसेच हस्तांतरित केलेल्या रकमेपैकी किती रक्कम परत मिळू शकते, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## वाळूज येथे महिला संस्थांच्या वार्षिक सभेत आरोग्य,शेती व उद्योग व्यवसायावर मार्गदर्शन

# चार महिला बचत गटांना प्रत्येकी १५ लाखांपर्यंत कर्जाचे धनादेश १८२ महिलांची आरोग्य तपासणी

**गंगापुर प्रतिनिधी:**वाळूज येथे महिला संस्थांची वार्षिक सर्वसाधारण सभा रांजणगाव (शे.पुं.) प्रतिनिधी : महिला आर्थिक विकास महामंडळाच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाई फुले तेजस्विनी लोकसंचालित साधन केंद्र, वाळूज यांची १७ वी, तर शिवकन्या अभिनव सहकारी संस्था, तुर्काबाद यांची प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभा १० ऑक्टोबर रोजी रांजणगाव येथील रावते मंगल कार्यालयात पार पडली. संगीताताई आडसुळे व ज्योती आगळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत महिला सक्षमीकरण, आरोग्य, कृषी व उद्योग व्यवसायावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संजीवनी, रमाई, माऊली आणि दामिनी या चार महिला बचत गटांना प्रत्येकी १५ लाख रुपयांपर्यंत कर्जाचे धनादेश वितरित करण्यात आले. तसेच शिवकन्या संस्थेच्या सभासदांना भाग प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.सीएमआरसी व्यवस्थापक प्रतिभा देसले यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या १७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी माविमचे सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी सुनील पैठणे,क्षेत्रीय अधिकारी हुसेनी,कृषी विभागाच्या कृषी सहाय्यक स्वाती सोनवणे,आयसीआयसीआय बँकेचे व्यवस्थापक सचिन जाधव, सीएसएमएसएस रुग्णालयाचे पोपट मोटे, जिल्हा आरोग्य विभागाचे अभिनय गुनविर, लीड बँकेचे



अधिकारी इंगळे,संस्थेच्या सचिव रईसा शेख, एफपीओ व्यवस्थापक कृष्णा चांदोडकर आदी उपस्थित होते.सभेच्या यशस्वितेसाठी एफपीओचे लेखापाल शिवनाथ मोरे, एलसी सचिन दांडगे,सीएमआरसीच्या लेखापाल शुभांगी तसेच सहयोगिनी कल्पना सोनवणे, सुशीला पठारे,संगीता शेजुळ,मीना कानडे,विजया काकडे,भारती आहेरकर आणि सीआरपी ताईंनी परिश्रम घेतले. या सभेला संस्थेच्या कार्यकारिणीतील महिला, सीएमआरसी कर्मचारी, आरपी ताई आणि विविध महिला बचत गटांच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**महिला उद्योजकांच्या उत्पादनांना बाजारपेठेची संधी**

महिला बचत गटांच्या माध्यमातून स्थापन झालेल्या दळवी फ्रुट प्रॉडक्ट्सच्या स्टॉलवर हळद पावडरची विक्री करण्यात आली. महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या उत्पादनांची ओळख वाढण्यास मदत होते. तसेच महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन साधता येते. स्थानिक उत्पादनांच्या विक्रीला चालना देत महिला उद्योजकांना व्यवसायवृद्धीची संधी मिळवून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

**शेती व उद्योग व्यवसायासाठी महिलांना मार्गदर्शन**

कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक दीपक गवळी यांनी महिलांना अन्नप्रक्रिया उद्योग, महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणी तसेच उत्पादनाचे पॅकिंग व लेबलिंग याबाबत मार्गदर्शन केले. या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी चंदनसिंग राठोड यांनी शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ), सभासद नोंदणी, शेतमाल खरेदी-विक्री केंद्र आणि विविध योजनांची माहिती दिली. महिलांच्या संस्थांना प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी मायक्रो एंटरप्राइज कर्ज, व्हीएसपी, सब-प्रोजेक्ट व मॅग्नेट योजनांची माहिती देण्यात आली. सहाय्यक निबंधक अधिकारी म्हस्के यांनी अवाजवी व्याजदराने कर्ज देणाऱ्या सावकारांविरोधात तक्रार करण्याचे आवाहन केले. एफपीओमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण रोखण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

**१८२ महिलांची आरोग्य तपासणी**

जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने १८२ महिलांची रक्त तपासणी व बीएमआय (शरीर वस्तुमान निर्देशांक) तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर महिलांना आवश्यक आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. सीएसएमएसएस रुग्णालय, लिंबे जळगाव येथील डॉ. प्रधान यांनी रुग्णालयात उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती दिली. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्मिता पाटणे यांनी महिलांचे आरोग्य, तसेच हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे उद्भवणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आरोग्य सल्लागार अक्षय नितनवरे यांनी लहान बालकांमध्ये आढळणाऱ्या पायांच्या विकृतींबाबत माहिती देत त्यांचे वेळीच निदान व उपचार करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

# 'आपला अमोल आपल्या दारी'चा सेवाभावी उपक्रम; जात प्रमाणपत्रे थेट नागरिकांच्या दारी!

**गंगापूर प्रतिनिधी:**

शासकीय कागदपत्रांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी राबविण्यात येणारा आपला अमोल आपल्या दारी' हा उपक्रम लासुर स्टेशन परिसरात नागरिकांसाठी उपयुक्त ठरत आहे. या उपक्रमांतर्गत आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल रमेश जाधव यांच्या माध्यमातून लासुर स्टेशन येथील नागरिकांना जात प्रमाणपत्रांचे घरपोहोच वितरण करण्यात आले.

जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नागरिकांना अनेकदा आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव, शासकीय कार्यालयांतील फेऱ्या आणि प्रक्रियेचा पाठपुरावा करावा लागतो. ही गैरसोय कमी करण्याच्या उद्देशाने अमोल रमेश जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयात नागरिकांकडून आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्यात आली. त्यानंतर संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून प्रमाणपत्रांची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. प्रमाणपत्रे तयार झाल्यानंतर ती नागरिकांच्या घरी पोहोचविण्यात आली.

**कार्यालयांचे हेलपाटे कमी,वेळेची बचत!**

सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा आणि आवश्यक कागदपत्रांचा लाभ सहज मिळावा, त्यांचा वेळ वाचावा तसेच अनावश्यक धावपळ टाळता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. केवळ अर्ज स्वीकारण्यापुरते मर्यादित न राहता



कागदपत्रांची पूर्तता, संबंधित विभागाकडे पाठपुरावा आणि प्रमाणपत्रांचे वितरण यासाठी पुढाकार घेतला जात असल्याने नागरिकांना दिलासा मिळत आहे.

**जनतेची सेवा हाच संकल्प, नागरिकांचा विश्वास हीच खरी कमाई!'**

या भावनेतून लासुर स्टेशन व परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.लोकाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांची शासकीय कामे सुलभ करण्याचा हा प्रयत्न परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत आराध्या कुबेरला रौप्यपदक; महानगरपालिकेच्या क्रीडा इतिहासात ऐतिहासिक कामगिरी!



**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, एन-७ सिडको येथील कुस्तीपटू आराध्या कुबेर हिने फ्रीस्टाईल ५४ किलो वजन गटात रौप्यपदक पटकावून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

रायगड येथे झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत आराध्याने दमदार कामगिरी करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली आणि रौप्यपदकावर आपले नाव कोरले. तिच्या या यशामुळे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.महानगरपालिकेच्या शालेय क्रीडा क्षेत्रात राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक मिळवण्याची आराध्याची कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली आहे. जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तिने हे यश संपादन केले.या उल्लेखनीय यशाबद्दल महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ,स्थायी समिती सभापती अनिल मकरीये विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर सभागृह नेते गोविंद केंद्रे महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे,अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील उपआयुक्त अंकुश पांढरे क्रीडा विभाग प्रमुख विजय पाटील , क्रीडा अधिकारी संजीव बालय्या, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, मुख्याध्यापक मनोज अग्रवाल, क्रीडा समन्वयक सागर मगरे आणि क्रीडा शिक्षक प्रितेश सराटे यांनी आराध्या कुबेरचे अभिनंदन करून पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.आराध्या कुबेरच्या या रौप्यपदकामुळे महानगरपालिका शाळांमधील खेळाडूंच्या गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

# कालिका मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी किरण जोशी उपाध्यक्षपदी गणेश वाडेकर



**गंगापूर प्रतिनिधी:**शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गंगापूर येथील नरसिंह कॉलनीतील प्रसिद्ध कालिका मित्र मंडळाची सन २०२६ साठी नवीन उत्सव समिती कार्यकारनी नगरसेवक राकेश कळसकर,आनंद पाटील,संतोष आंबिलवादे, सोपान देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.मंडळाच्या विशेष बैठकीत यंदाचा नवरात्रोत्सव भव्य, उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.यावेळी सर्वानुमते नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.मंडळाच्या अध्यक्षपदी किरण जोशी यांची,तर उपाध्यक्षपदी गणेश वाडेकर यांची निवड करण्यात आली. सचिवपदी किरण सरोदे, सहसचिवपदी इंदर कराळे व केतन बुचुडे, कोषाध्यक्षपदी कैलास कराळे,तर सहकोषाध्यक्षपदी महेश बिडकर,योगेश कुलकर्णी व प्रीतम ठाकूर यांची निवड करण्यात आली.

नवरात्रोत्सवाचे नियोजन अधिक प्रभावी आणि दर्जेदार व्हावे,यासाठी नगरसेवक राकेश कळसकर,आनंद पाटील, संतोष आंबिलवादे,सोपान भाऊ देशमुख तसेच माजी नगरसेवक मुकुंद जोशी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यंदाच्या उत्सवात धार्मिक कार्यक्रमांसह विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मंडळाच्या वतीने जाहीर करण्यात आले.या बैठकीला मंडळाचे सदस्य गोरख जावळे,दत्तू बुचडे, संजय राऊत,मुकुंद जोशी,रवी भालेराव,किरण सरोदे, अर्जुन कराळे,अक्षय कळसकर,इंदर कराळे,कल्पेश कराळे,गौरव कराळे,आकाश बुचुडे,केतन बुचुडे,दीपक पदार,प्रीतम ठाकूर,योगेश कुलकर्णी,सुहास धामणे, कैलास कराळे,मंगेश जोशी,योगेश कुरकुटे,योगेश कुंभकर्ण उपस्थित होते.नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून यंदाचा नवरात्रोत्सव भक्तिमय वातावरणात आणि नागरिकांच्या सहभागातून यशस्वी करण्याचा निर्धार मंडळाच्या सदस्यांनी व्यक्त केला.

# ‘प्रगतिशील महाराष्ट्र-’२०२६ प्रदर्शनात महावितरणच्या स्टॉलचा गौरव




**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या ‘प्रगतिशील महाराष्ट्र-२०२६’ प्रदर्शनात परिणामकारक मांडणी व ग्राहकांशी प्रभावी संवाद साधल्याबद्दल महावितरणच्या स्टॉलचा ‘बेस्ट स्टॉल’ म्हणून गौरव करण्यात आला. अमळनेर येथे आयोजित तीन दिवसीय प्रदर्शनात केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध विभागांच्या वतीने एकूण ७५ स्टॉल उभारण्यात आले होते. यात स्टॉलची उत्कृष्ट मांडणी आणि ग्राहकांशी प्रभावी संवाद केल्याबद्दल महावितरणच्या स्टॉलचा गौरव करण्यात आला.

खासदार स्मिता वाघ, अमळनेरचे आमदार अनिल पाटील, पारोळा - एरंडोलचे आमदार अमोल पाटील व इतर मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट स्टॉलचा पुरस्कार मिळवणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. सांघिक कार्यालयातील उपमुख्य जनसंपर्क अधिकारी प्रवीण स्थूल, अमळनेरचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता ज्ञानेश्वर अंबाडकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.महावितरणच्या दालनात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलर योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेसह स्मार्ट मीटरच्या फायद्याची माहिती देण्यात आली. तीन दिवसांत जवळपास १२ हजारांहून अधिक नागरिकांनी महावितरणच्या स्टॉलला भेट दिली.

जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी, अधीक्षक अभियंता मदन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्टॉल उभारण्यात आला. धरणगाव विभागाचे कार्यकारी अभियंता नीलेश सोनगिरे, जळगाव परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, उपकार्यकारी अभियंता मनोज भावसार, सहायक अभियंता हितेंद्र बढे, मनोज वाडिले, विनायक बोरसे, हेमंत सैदाणे, नितीन ठवकर, मोहन नेवाळे, भाऊसाहेब महाजन, तंत्रज्ञ दीपक अहिरे, सुषमा हजारे यांनी प्रदर्शनादरम्यान ग्राहकांना सर्व योजनांची माहिती दिली. तसेच विद्युत सुरक्षा व वीजबचतीबाबत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. यावेळी प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात येऊन विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. दालनात ग्राहकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यावर तत्परतेने कार्यवाही करण्यात आली.

# दुष्काळग्रस्त गावांत रोजगार, अन्नसुरक्षा आणि पाणीपुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करा!

## शेतकरी नेते संतोष पाटील जाधव यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; चारा छावण्या, पीकविमा आणि जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची मागणी



**गंगापूर प्रतिनिधी:**गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव जिल्हा परिषद सर्कलमधील विविध गावांतील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेत जिल्हा परिषद सदस्या सविता संतोष पाटील जाधव आणि शेतकरी नेते तथा माजी सभापती संतोष पाटील जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी संतोष पाटील जाधव म्हणाले की, राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पुढील सहा ते आठ महिने शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. या काळात रोजगारनिर्मिती, अन्नसुरक्षा, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि पशुधनासाठी चारा-पाण्याचे नियोजन प्राधान्याने करणे आवश्यक आहे. गरजू कुटुंबांपर्यंत अन्नधान्य पोहोचविण्यासह रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने ठोस कृती आराखडा तयार करावा,असे त्यांनी नमूद केले.खरीप पिकांचे नुकसान; शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट जिल्हा परिषद सदस्या सविता जाधव म्हणाल्या की, मान्सूनच्या सुरुवातीच्या दीड महिन्यात चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांना चांगल्या उत्पादनाची अपेक्षा होती. मात्र, पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असताना सुमारे दोन महिने पावसाचा खंड पडल्याने कापूस, मका, तूर आणि सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले. शिल्लेगाव सर्कलमधील गावांनाही या परिस्थितीचा मोठा फटका बसला आहे.पाण्याअभावी रब्बी हंगामातील पेरणीची शक्यता कमी झाली असून खरीप पिकांचे नुकसान भरून काढण्याची संधीही शेतकऱ्यांना मिळणे कठीण झाले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांसह अल्पभूधारक शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे रोजगार हमीच्या कामांना गती देऊन अन्नसुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच पीकविम्याची रक्कम तातडीने मंजूर करावी, अशी मागणी करण्यात आली.केंद्रीय अधिकाऱ्यांच्या तीन पथकांनी अहिल्यानगर, सोलापूर,जालना,बीड,धाराशिव,वाशिम आणि यवतमाळ आदी जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून शेती,जलस्रोत आणि शेतकऱ्यांच्या समस्यांची माहिती घेतली आहे. या पाहणीचा अहवाल केंद्र सरकारला सादर झाल्यानंतर नुकसानभरपाई आणि मदतीसंदर्भातील निर्णयांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, असे आवाहन संतोष पाटील जाधव यांनी केले.

### पिण्याच्या पाण्यासाठी टँकरचे नियोजन करा

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. अनेक लहान गावांमधील जलस्रोत आटल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे प्रत्येक गावासह वाडी-वस्तीपर्यंत टँकरद्वारे नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करावा. पाण्याचे योग्य वितरण आणि उपलब्ध जलसाठ्यांचा काटकसरीने वापर करण्यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि रोजगारनिर्मिती

दुष्काळावर दीर्घकालीन उपाय म्हणून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतून जलसाठ्यांमधील गाळ काढणे, जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आणि गरजेनुसार नवीन बंधाऱ्यांना मंजुरी देऊन कामे सुरू करावीत. माथा ते पायथा’ या संकल्पनेनुसार जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देऊन लोकसहभागातून पाणीसाठा वाढविण्याचे प्रयत्न करावेत. या कामांमुळे जलस्रोतांचे पुनरुज्जीवन होण्याबरोबरच ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होऊन नागरिकांना आर्थिक आधार मिळू शकतो.

### पशुधनासाठी चारा छावण्या उभारण्याची मागणी

पशुधनासाठी चारा आणि पाण्याचे नियोजनही तातडीने करण्याची आवश्यकता असल्याचे संतोष जाधव यांनी सांगितले. उपलब्ध चाऱ्याचा साठा मर्यादित असल्याने चाऱ्याची गावनिहाय उपलब्धता तपासून शासनाने निश्चित केलेल्या दराने चारा खरेदी व साठवणूक करावी. तसेच चाऱ्याची टंचाई भासल्यास अन्य राज्यांतून चारा उपलब्ध करून घेण्याचा विचार करावा. गरजेनुसार चारा छावण्या आणि पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था उभारावी, अशी मागणी त्यांनी केली.

**पोषण,खेळ आणि शिक्षणाचा संगम:**

# नारायणपूर बु.येथील आदर्श अंगणवाडीत नाविन्यपूर्ण उपक्रम

**गंगापूर प्रतिनिधी:**

राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत नारायणपूर ग्रामपंचायती अंतर्गत अंगणवाडी क्रमांक ३ येथे नवचेतना आधारशीला मेळाव्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. जिल्ह्यात आदर्श अंगणवाडी म्हणून नावलौकिक मिळवलेल्या या केंद्रात बालकांच्या शारीरिक,मानसिक,बौद्धिक व सर्जनशील विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्घाटन माजी सरपंच नासेर पटेल यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. लयावेळी ग्रामविकास अधिकारी स्वप्नील घरमोडे यांनी संतुलित व पोषणयुक्त आहाराचे महत्त्व, त्यातील घटक आणि असंतुलित आहाराचे दुष्परिणाम याविषयी पालकांना मार्गदर्शन केले. बालकांच्या आहारात धान्य, डाळी, कडधान्ये, हिरव्या पालेभाज्या, फळे, दूध व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करण्याचे आवाहन त्यांनी केले.मेळाव्यात हातांचे पंजे व पायांचे ठसे यांच्या साहाय्याने तयार केलेल्या कृतीमार्गावर बालकांनी विविध खेळांत सहभाग घेतला. उड्या मारणे, संतुलन राखणे आणि ठरावीक क्रमाने हालचाली करणे अशा उपक्रमांतून एकाग्रता, शारीरिक समन्वय व आत्मविश्वास वाढविण्यावर भर देण्यात आला. शैक्षणिक साहित्य, खेळणी व चित्रफलकांच्या माध्यमातून खेळातून शिक्षणाची संधीही उपलब्ध करून देण्यात आली.

नासेर पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्वप्नील घरमोडे यांच्या सहकार्याने अंगणवाडीच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते शिराज पटेल,हरिभाऊ मुळे,पोलीस पाटील तय्यब पटेल,राजू शेख,ग्रामपंचायत कर्मचारी मुख्तार शेख,अनिस शेख,हमीद शेख,मोबीन पटेल,करण जमधडे,अशोक जगधने,इकोसत्वचे महादेव चांदगुडे,आशा सेविका शबाना शेख,दिव्या शिरसाठ, अंगणवाडी सेविका इर्शादबी शेख,सविता धोत्रे,सुवर्णा खरात तसेच अंगणवाडी मदतनीस चंद्रकला जमधडे,उषा जमधडे,शितल जमधडे,रमा कोल्हे, पर्यवेक्षक चित्रा खोचे, सुनीता बर्डे,सुनीता सुतार,सुमन प्रधान,सोनाली जाधव, वहिदा शेख,मोनिका घोरपडे,सावित्रा साठे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या पहिल्या पर्वातील पुरस्कारांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण

**नाशिक,प्रतिनिधी:**ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० पाण्याचा प्रत्येक थेंब साठविणे, तलावांतील गाळ काढणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत पुरस्कार वितरण सोहळा, अभियान २०२६-२७ चा शुभारंभ तसेच सरपंच परिसंवाद - दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प’ या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

# कर्णपुरा देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी



छायाचित्र:जीवन वैष्ण

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** शहरातील प्रसिद्ध कर्णपुरा देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांची मोठी गर्दी होत असून, देवीच्या दर्शनासाठी महिला, पुरुष आणि लहान मुलांची मोठ्या संख्येने उपस्थिती पाहायला मिळत आहे. मंदिरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, भाविकांकडून देवीची आरती व पूजाअर्चा करून सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली जात आहे. नवरात्रोत्सवामुळे परिसरात उत्साह आणि भक्तीमय वातावरण पाहायला मिळत आहे.

# अनिस कुरैशी यांची मराठवाडा उपाध्यक्षपदी नियुक्ती



**पाचोड,प्रतिनिधी:**संपादक पत्रकार असोसिएशन, महाराष्ट्र राज्यच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी अनिस रज्जाक कुरैशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इस्माईल एस. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली.कुरैशी अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. संघटनेच्या वतीने त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. तसेच कायदे व संघटनेच्या नियमांचे पालन करून पत्रकार जगताच्या हितासाठी कार्यरत राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष अशोक खरात, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संतोष डवरे, महाराष्ट्र प्रदेश महासचिव आकिब शेख, तसेच कायदे सल्लागार ॲड.भारत मुळे आणि ॲड.अविनाश दांडगे यांची नावे नियुक्तीपत्रावर नमूद आहेत.अनिस रज्जाक कुरैशी यांच्या नियुक्तीबद्दल पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार आणि विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# शेतकऱ्यांना बँकांच्या चकरा मारायला लावू नका ...अन्यथा खपवून घेणार नाही! : रविंद्र चव्हाण

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा गंगापूर तालुक्यात आढावा भाजप तालुकाध्यक्षांचा बँकांना थेट इशारा



**गंगापूर प्रतिनिधी:**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना बँकांचे उंबरठे झिजवावे लागत असतील, तर हे अजिबात खपवून घेतले जाणार नाही,असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा भारतीय जनता पार्टीचे गंगापूर तालुकाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी तालुक्यातील सर्व बँक व्यवस्थापकांना दिला आहे.

आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली चव्हाण यांनी विविध बँकांना प्रत्यक्ष भेटी देत कर्जमाफी योजना आणि पीककर्ज वितरणाच्या कामकाजाचा आढावा घेतला.गंगापूर तालुक्यात कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान काही शेतकऱ्यांना बँकांकडून अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी वारंवार बँकेत बोलावणे,प्रकरणे प्रलंबित ठेवणे,योग्य माहिती न देणे आणि कामकाजात विलंब होणे,यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शासनाच्या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असतील,तर संबंधित बँकांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.या पार्श्वभूमीवर रविंद्र चव्हाण यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया,महाराष्ट्र ग्रामीण बँक,स्टेट बँक ऑफ इंडिया,बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांसह विविध बँकांना प्रत्यक्ष भेटी दिल्या.यावेळी कर्जमाफीसंदर्भातील प्रलंबित प्रकरणे,शेतकऱ्यांच्या अडचणी,कागदपत्रांची पूर्तता आणि बँकांकडून दिले जाणारे मार्गदर्शन याबाबत माहिती घेण्यात आली. शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे. त्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कामकाज करावे, अन्यथा शेतकऱ्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांकडे पाठपुरावा केला जाईल, अशी भूमिका भाजप तालुकाध्यक्षांनी घेतली आहे.



कर्जमाफी योजनेत पात्र शेतकऱ्यांची प्रकरणे नियमानुसार आणि विहित वेळेत मार्गी लावावीत,आवश्यक कागदपत्रांची स्पष्ट माहिती द्यावी आणि प्रलंबित प्रकरणांबाबत शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे कर्जमाफी योजनेचा लाभ देताना शेतकऱ्यांना सन्मानपूर्वक वागणूक द्यावी.त्यांची कामे वेळेत मार्गी लावा.विनाकारण बँकेत चकरा मारायला लावू नका. शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी आल्यास त्या खपवून घेतल्या जाणार नाहीत.गंगापूर तालुक्यातील सर्व बँक व्यवस्थापकांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

रविंद्र चव्हाण : गंगापुर भाजपा तालुकाध्यक्ष

THIS NEWSPAPER IS PUBLISHED BY **ARCHANA SANDEEP KALE** FROM PLOT NO.489, SAMARTH KRUPA, N-1/F, BEHIND GARWARE STADIUM, NEAR POWER HOUSE, TOWN CENTER CIDCO, CHHAPTRAPATI SAMBHAJINAGAR (M.S.) 431003 ON BEHALF OF **ARCHANA SANDEEP KALE** EDITED BY **ARCHANA SANDEEP KALE** AND PRINTED BY **ARCHANA SANDEEP KALE** AT MANASI PRINTERS, PLOT NO. 45A, SERVICE INDUSTRY SECTOR, CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR, MAHARASHTRA - ■ **Mob. No: 8459270916** ■ **Email-sahyadritimesaura@gmail.com** ■ **RNI No. MAHMAR/2003/10715**